श्री. सचिन पोपट जावळे, प्राथमिक शिक्षक
जि.प.प्रा.शा.वाकी,ता.जामखेड, जिल्हा - अहमदनगर यांचे अनाधिकृतपणे गैरहजर गैरवर्तनाबाबाबत

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग प्राथमिक
जिल्हा परिषद आदेश क्रमांक कार्या2/खाचौद/169/2019
अहमदनगर, दिनांक -07/ 03/2019

संदर्भ - 1) गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जामखेड यांचेकडील 1 ते 4 दोषारोप ज्ञापन क्रमांक वशि/स्था/272/2017, जामखेड,दिनांक 06/07/2017
2) या कार्यालयाकडील दोषारोप ज्ञापन क्रमांक वशि/खाचौ/917/2017 अहमदनगर, दिनांक 29/09/2017
3) गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती जामखेड यांचेकडील पत्र क्रमांक वशि/आस्था1/31/2018/, दिनांक 17/01/2019
4) महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, 1964
5) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक सेनिवे/1001/130/सेवा-4, दिनांक 2 जून 2003

श्री. सचिन पोपट जावळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाकी,ता.जामखेड, जिल्हा - अहमदनगर हे शालेय कामकाजासाठी अनाधिकृतपणे गैरहजर असलेबाबत गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड यांनी या कार्यालयांस त्यांचेकडील पत्र क्रमांक वशि/आस्था/272/2017, दिनांक 06/07/2017 अन्वये कळविलेले आहे.

श्री.जावळे हे स्वत:च्याच अधिकारात गैरहजर असून. त्याचप्रमाणे अनाधिकृतपणे रजेवर न जाणेबाबत गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जामखेड यांनी लेखी कळविले तरीही श्री.जावळे हे वरिष्ठ कार्यालयाकडून रजा मंजूर करुन घेता अनाधिकृतपणे रजेवर गेलेले आहेत. सदरच्या या गैरवर्तनामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाकी, ता.जामखेड येथील विद्यार्थ्याचे शैक्षणिक कामकाजाचे नुकसान झालेले असून, त्यांच्या या गैरवर्तनामुळे शैक्षणिक दप्तर ही विहित मुदतीत वेळेवर पुर्ण झालेले नाही. या गैरवर्तनामुळे आपलेकडून महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 चे नियम 3 चा भंग झालेला आहे.

गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड यांनी आपले विरुध्दचे 1 ते 4 दोषारोप ज्ञापन या कार्यालयांस पत्र क्रमांक वशि/आस्था/272/2017, दिनांक 06/07/2017 अन्वये सादर केलेले आहेत. त्यानुसार या कार्यालयाकडील दोषारोप ज्ञापन क्रमांक वशि/917/2017, दिनांक 29/09/2017 अन्वये बजाविणेत आलेले होते. तथापी श्री.जावळे यांनी विहित मुदतीत व वेळेत खुलासा सादर केलेला नाही.

गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड, यांचेकडील पत्र क्रमांक वशि/आस्था1/31/2018, दिनांक 17/01/2019 अन्वये श्री. सचिन पोपट जावळे, अनाधिकृत गैरहजर प्राथमिक शिक्षक हे दिनांक 11/12/2018 रोजी मयत झालेले आहेत.

सबब मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर, सदर प्रकरणी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, 1964, भाग तीन मधील नियम 5 नुसार प्रदान असलेल्या अधिकारानुसार श्री.सचिन पोपट जावळे हे दिनांक 11/12/2018 रोजी मयत झालेले असल्यामुळे श्री. सचिन पोपट जावळे, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाकी, ता.जामखेड यांची विभागीय चौकशी संपुष्टांत आणणेत येत आहे.

तसेच आपला दिनांक 08/09/2017 ते 10/12/2018 अखेर एकूण 1 वर्षे 3 महिने 3 दिवसांचा अनाधिकृत गैरहजेरीचा कालावधी हा महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक सेनिवे/1001/130/सेवा-4, दिनांक 2 जून 2003 अन्वये सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ अकार्यदिन (Dies Non) म्हणून नियमित करणेत येत आहे. सदर आदेशाची नोंद श्री. सचिन पोपट जावळे, अनाधिकृत गैरहजर, प्राथमिक शिक्षक यांचे मुळ सेवापुस्तकांत घेणेत यावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संकेतांक क्रमांक 201903071600 94 असा आहे.

(विश्वजीत माने) 7/3/19
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जामखेड

2/- सदर आदेशाची नोंद कै. श्री.सचिन पोपट जावळे, प्राथमिक शिक्षक यांचे मुळ सेवा पुस्तकांत घेणेत येऊन, सेवा पुस्तकांत घेतलेल्या नोंदीची स्वाक्षांकित प्रत इकडील कार्यालयांस सादर करणेची दक्षता घेणेत यावी.

(विश्वजीत माने) 7/3/19
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर